क्र.पोमसं/20/199/भाडेकरू(टेनन्ट)/सर्व घटक/68/2013 दि. 15/02/2013

विषय :- मालकांकडून भाडेकरूची (टेनन्ट) माहिती पोलीस स्टेशनला कळविणेबाबत.

परिपत्रक :-

1. CRPC -144 अतंर्गत आदेशाप्रमाणे भाडेकरू म्हणून राहणा-या व्यक्तींची माहिती मालक यांनी संबंधित पोलीस ठाण्यांना देणे बंधनकारक करण्यात आले आहे.
2. असे निदर्शनास आले आहे की,कायदयाप्रमाणे अपेक्षित कार्यवाहीचे पलीकडे जाऊन स्थानिक पातळीवर अशी प्रथा सुरू करण्यात आली आहे ज्याची कायदयामध्ये काहीही तरतूद नाही.तेवढेच नव्हे,आम नागरीकांना या आदेशाखाली विनाकारण गैरसोय व त्रास देण्यात येत आहे.
3. या कायदयाअतंर्गत आदेशाप्रमाणे संबंधितांनी (i) लागणारी माहिती पोलीस ठाण्याला कळविणेची तरतूद आहे.तसेच याबाबत ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate (NOC)) देणे घेणेची मुळीच तरतूद नाही.
4. (i) परंतू असे निर्दशनास आले आहे की,काही ठिकाणी दोन्ही मालक व भाडेकरू(टेनन्ट) यांना पोलीस ठाण्याला बोलविले जाते.तेवढेच नव्हे,तेथे त्यांना बराच काळ बसून राहावे लागते.

   (ii) काही ठिकाणी ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देणे घेणेची रीतसर पध्दत सुरू करण्यात आली आहे आणि NOC उपलब्ध करून देणे घेणेसाठी मध्यस्थपण (Middleman / Agent) अस्तित्वात आले असे निदर्शनास आले आहे.

   (iii) काही ठिकाणी दस्तावेजची मागणी केली जाते.(उदा-Lease ची प्रत.इ)
5. सदरची पध्दत अयोग्य असून कायदेशीर नसल्याने ती बंद करण्यात यावी.
6. (i) स्थानिक पातळीवर पोलीसांनी वेगवेगळया व नियमबाहय पध्दतींचा वापर करणे ही बाब नागरीकांना त्रास देण्यामध्ये मोडते.

   (ii) CRPC - 144 आदेशातंर्गत मालकांने भाडेकरूची माहिती पोलीस ठाण्याला कळविण्यासाठी सुसूत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी ती माहिती टपालाने,रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात यावे.

   (iii)वरील सूचनेची प्रसिध्दी पोलीस ठाणेमध्ये दर्शनी भागात बोर्ड लावून व हौसिंग सोसायटी व इतर रहिवासी सोसायटयांमार्फत सर्व जनतेत करावी.

15.02.13

(अहमद जावेद)
अपर पोलीस महासंचालक (का.व.सु)
पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधीक्षक

प्रत माहितीकरीता,

सर्व अपर पोलीस महासंचालक
सर्व परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक
प्रादेशिक अपर पोलीस आयुक्त (सर्व पोलीस आयुक्तालयातील)

क्र.पोमस/20/199/भाडेकरु(टेनन्ट)/सर्व घटक/68/2013-14 मुंबई, दि.05.02.2014

संदर्भ :- या कार्यालयाचे परिपत्रक समक्रमांक दिनांक 15.02.2013

विषय : घरमालकांकडून भाडेकरुंची (टेनन्ट) माहिती पोलीस स्टेशनला कळविणेबाबत.

******

परिपत्रक :-

या कार्यालयाचे उपरोक्त नमूद संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत.

1. घरमालक यांनी भाडेकरुंचे बाबतीत संबंधीत पोलीस ठाण्यामध्ये माहिती पुरविण्याचा नमुना [सोबत जोडला आहे.] यापुर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व घटकांचे सर्व विहीत नमूने रद्द करण्यात येत आहेत.

2. घरमालक सोबतच्या विहीत नमुन्यामध्ये माहिती भरुन सदर माहिती रजिस्टर पोस्टाने / कुरीअरने किंवा स्वहस्ते अथवा अन्य व्यक्तीच्या मार्फत संबंधीत पोलीस ठाण्यात पाठवू शकतात.

5/2/14

( देवेन भारती )
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.)
पोलीस महासंचालक, म.रा.,मुंबई यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधीक्षक

प्रत माहितीकरीता,

सर्व अपर पोलीस महासंचालक
सर्व सह पोलीस आयुक्त,
सर्व परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक
प्रादेशिक अपर पोलीस आयुक्त (सर्व पोलीस आयुक्तालयातील)